# बुद्धकालीन प्राचीन भारतातील शासन व्यवस्था एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

## रामानंद स्वामी तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य
विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र
विषयातील पीएच.डी.पदवीकरिता सादर करण्यात येणारा
शोध प्रबंधाचा आराखडा

**संशोधक**

**विनोद सहदेव वानखडे**

**M.A. B.ed, NET, SET**

**संशोधन मार्गदर्शक**

डॉ. मानवते यु. एच.

M.A. NET,Ph.D.

बी. पी.ई. कॉलेज हनेगाव.जि. नांदेड

वर्ष २०२२

# बुद्धकालीन प्राचीन भारतातील शासन व्यवस्था एक अभ्यास

प्रस्तावना:-

भारत हा एक जगातील अनेक प्राचीन संस्कृती पैकी प्राचीन राजकीय संस्कृती असलेला देश आहे. वैदिक काळापासून अस्तित्वात असलेली राजकीय संस्कृती उत्तर वैदिक काळामध्ये सुद्धा अस्तित्वात होती. प्रस्थापित पश्चिमात्य राजकीय विचारापेक्षा प्राचीन भारतीय राजकीय विचार हा जगातील एक महत्त्वाचा राजकीय विचार आहे. दीर्घकाळपर्यंत या विचारांची परंपरा सुरू होती. राज्यसंस्था व्यक्ती व शासन यंत्रणा याबाबत या परंपरेने स्वतःचा वेगळा विचार जगापुढे आणण्याचा प्रयत्न केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत त्यांनी स्वतःची अशी व्यवस्था अमलात आणली. लोकप्रशासन व आंतरराष्ट्रीय राजकारण याबाबत देखील या परंपरेने समाजास नवी दृष्टी देण्याचे काम केले. त्यामुळे या प्राचीन राजकीय विचार परंपरेचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. बुद्धांनी सामाजिक कराराचा सिद्धांत मांडून धम्म व नैतिकतेचे महत्व प्रस्थापित केले. प्रसेनजित राजाला व सिंह सेनापतीला गौतम बुद्धांनी जो उपदेश केला तो आजही महत्त्वाचा आहे. स्त्रियांच्या अधिकाराचे समर्थन, जन्मजात जाती व्यवस्थेस विरोध, विवेकनिष्ठा, लोकसत्ताक राज्याचा पुरस्कार व नैतिकतेवर अखंड निष्ठा ही बुद्ध विचारांची वैशिष्ट्य होते.वर्ण व्यवस्था , जातीभेद ,अस्पृश्यता ह्या विचारावर बौद्ध विचारवंतांनी कठोर टीका केली.

भारतातील राजकारणात लोकशाही तत्वाचे आचरण होत होते आणि बुद्धाच्या संघाचे जे व्यवस्थापन होते ते लोकशाही पद्धतीचे होते. राजा यास बुद्धाने महासंमत म्हटले आहे .पण दुर्दैवाने लोकशाही परंपरा नंतर नामशेष झाल्या पौर व जनपद यासारख्या संस्था होत्या त्या पण नामशेष झाल्या आणि गुप्त काळानंतर राजाचा प्रभाव वाढला.

प्राचीन बुद्धकालीन शासन व्यवस्थांचा अभ्यास करताना असे दिसते की बुद्धांच्या विचारांचा केंद्रबिंदू मानव हा होता मानवाचा विकास करणे हाच

उद्देश बुद्धांचा होता म्हणून त्यांनी लोकशाहीला महत्त्व देऊन तिचे समर्थन केले होते

आज भारतामध्ये लोकशाही व्यवस्था असली तरी या लोकशाही व्यवस्थेची पाळीमुळे आपल्याला प्राचीन भारतात पाहायला मिळतात प्राचीन भारतात अनेक गणराज्य अस्तित्वात होते या गणराज्यातील शासन प्रमुख हे लोकांनी नियुक्त केलेले असत. त्याचबरोबर एखादा शासन प्रमुख योग्य कार्य करत नसेल तर त्याला पदावरून दूर करण्याचा अधिकार लोकांना होता . महाजनपदामध्ये असलेले शासक हे वंशपरंपरागत पद्धतीने निवडलेले असत. प्राचीन भारतातील राजकीय विचार हा जगातील एक महत्त्वाचा विचार आहे आज भारतामध्ये संसदीय लोकशाही , गणराज्य पद्धती स्वीकारलेली आहे अशाच पद्धतीची संसद ही प्राचीन काळामध्ये सुद्धा गणराज्यामध्ये भरवली जात असे.बुद्धांनी जगाला समता, स्वातंत्र्य ,बंधुता ,न्याय,विज्ञानवादी ,विवेकवादी विचार दिलेला आहे. बुद्धाचा कालखंड हा इ.स. पू. 563 इ. स.पू.483 हा होता या कालखंडातील प्राचीन भारतामध्ये असलेल्या शासन व्यवस्थांचा अभ्यास करणे एक राज्यशास्त्राचा विद्यार्थी म्हणून या विषयावर संशोधन करण्याचे ठरवलेले आहे.

## संशोधनाचा उद्देश:-

1) प्रस्तुत संशोधनाचा उद्देश प्राचीन बुद्धकालीन शासन व्यवस्था यांचा अभ्यास करणे हा होय.

2) बुद्धकालीन प्राचीन भारतीय गणराज्य व आधुनिक गणराज्य यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

3) बुद्धकालीन शासन व्यवस्थे संदर्भात बुद्धांच्या विचारांचा अभ्यास करणे.

## संशोधनाचे महत्त्व व गरज:-

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व असे स्पष्ट करता येईल की भारताला समृद्ध असा राजकीय वारसा लाभलेला आहे. या राजकीय संस्कृतीचा अभ्यास करणे ही आजच्या लोकशाही गणराज्य असलेल्या आपल्या देशात गरज आहे.

बुद्धाच्या कालखंडामध्ये अस्तित्वात असलेल्या शासन व्यवस्थांचा अभ्यास करने महत्त्वाचे वाटते. गणराज्य पद्धती बरोबरच महाजन पदे यांचा सुद्धा अभ्यास करणे गरजेचे वाटते. बुद्धकालीन भारतातील शासन व्यवस्था कशा पद्धतीने कार्यरत होती याचा अभ्यास करणे हे महत्त्वाचे वाटते शासन व्यवस्थेचे संचालन कशा पद्धतीने होत होते याच्या अभ्यास करणे गरजेचे वाटते. बुद्धाचे लोकशाही संबंधी विचार याचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

## संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा:-

प्रस्तुत संशोधनाचा कालखंड हा इसवी सन पूर्व सहावे शतक व पाचवे शतक आहे. या कालखंडात असणाऱ्या शासन व्यवस्थांचा अभ्यास आणि बुद्धांच्या राजकीय विचारांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात येणार आहे. या संशोधनाची मर्यादा अशी सांगता येईल की या संशोधनामध्ये संपूर्ण प्राचीन कालखंड विचारात घेतलेला नाही इसवी सन पूर्व सहावे व पाचवे शतकामध्ये असलेल्या शासन व्यवस्थांचा अभ्यास करण्यात येणार आहे. ही एक मर्यादा या संशोधनाची सांगता येईल.

## गृहीतके:-

1) बुद्ध काळात गणराज्य पद्धती अस्तित्वात होती

2) बुद्ध कालखंडामध्ये लोकशाही पद्धतीचे गणराज्य अस्तित्वात होते

3) बुद्धांचे विचार लोकशाहीस पूरक होते

4) गणराज्यामध्ये प्रत्यक्ष लोकांचा सहभाग होता

5) महाजनपदा मध्ये राजेशाही पद्धती होती.

6) बुद्धाच्या संघाची रचना व कार्यपद्धती गणराज्यातील संघाप्रमाणेच कार्यरत होती.

7) न्यायव्यवस्था ही आधुनिक काळातील न्यायव्यवस्थेप्रमाणेच होती.

## संशोधन पद्धती व तंत्र:-

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे त्याचबरोबर ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा सुद्धा उपयोग करण्यात येणार आहे.

## तथ्य संकलनाची साधने :-

**1) प्राथमिक साधने**:-

शिलालेख ,नाणे ,आत्मचरित्र ,प्राचीन ग्रंथ ,पाली साहित्य ,संस्कृत साहित्य, जैन साहित्य , विविध लेण्यांमधील शिल्पांचा अभ्यास विविध विचारवंताचे लेख व ग्रंथ या माध्यमातून प्राथमिक तथ्य गोळा केले जातील.

2) **दुय्यम साधने**:-

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधने म्हणून विविध विचारवंताने लिहिलेले ग्रंथ ,पाठ्यपुस्तके ,विविध वृत्तपत्रातील व मासिकांमधील लेख ,प्रकाशित साहित्य, अप्रकाशित शोध निबंध या माध्यमातून तथ्य गोळा केले जातील.

## संशोधनाची प्रकरण योजना:-

1) प्रस्तावना
2) बुद्ध पूर्व पूर्वकालीन शासन व्यवस्थेचा अभ्यास
3) बुद्धकालीन गणराज्य व महाजनपद
4 ) बुद्धकालीन व आधुनिक भारतीय गणराज्याचा तुलनात्मक अभ्यास
5) बुद्धांचे राजकीय विचार
6) उपसंहार

**1)** प्रस्तावना:

प्रा. अशोक चौसाळकर यांनी प्राचीन भारतातल्या राजकीय व्यवस्थेविषयी आपले विचार स्पष्ट केले आहेत या ग्रंथामध्ये त्यांनी असे सांगितले की प्राचीन भारतीय राजकीय विचाराची सुरुवात इसवी सन पूर्व सहाव्या शतकात झाली. त्यापूर्वी राजकीय विचारांनी स्वतंत्र अस्तित्व धारण केले नव्हते सहाव्या शतकात म्हणजे बुद्धकाळात सामाजिक क्रांती झाली आणि त्यातून नवे विचार उदयास आले .भारतीय राज्यशास्त्राचा उदय  बुद्ध काळातच झाला असे मत माडले.

प्रख्यात अमेरिकी राज्यशास्त्रज्ञ नॉर्मन पामर यांनी असे मत व्यक्त केले जागतिक विचारांच्या इतिहासात पाश्चात्य राजकीय विचारांची परंपरा सोडली तर प्राचीन भारतीय राजकीय विचारांची परंपरा हीच महत्त्वाची आहे कारण चिनी व मुस्लिम राजकीय विचार भारतीय राजकीय विचारा इतका समृद्ध नाही. गौतम बुद्धांनी अर्थशास्त्र परंपरेतील वास्तववादी व साध्य साधन विवेक न मानणाऱ्या विचारांना विरोध केला. त्यांच्या विचारात धर्म व नैतिकतेस महत्त्वाचे स्थान होते. बुद्ध विचारवंतानी राज्याच्या उदयाचा सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला बुद्धांनी त्यांच्या भिक्षू संघामध्ये लोकशाहीवादी राज्यघटना लागू केली. धम्म व दंड यांच्या संघर्षात दंडापेक्षा धम्मास जास्त महत्त्व दिले त्यांच्या तत्त्वज्ञानात सत्य , अहिंसा रूजूता व साम यास जास्त महत्त्व होते त्यानी चक्रवर्ती राजाची संकल्पना मांडली आणि अशा धम्म राज्याची कल्पना केली की ज्यामध्ये हिंसा असत्य व अनैतिकता यांना स्थान असणार नाही जनतेस धम्मपालनासाठी प्रवृत्त करणे व धम्मविजयाच्या आधारे सर्व जगात धम्मचक्र प्रवर्तन करणे हे गौतमाचे ध्येय होते जगातील संघर्ष ज्या कारणांनी निर्माण होतात त्या कारणांचे निराकरण करणे आवश्यक आहे असे गौतमाचे विचार होते.

**2)** बुद्ध पूर्व पूर्वकालीन शासन व्यवस्थे चा अभ्यास:-

बुद्ध पूर्व काळातील शासन संस्थाचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे .वैदिक काळामध्ये उत्तर वैदिक काळामध्ये असलेल्या सभा आणि समिती चा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे. बुद्धपूर्व काळातील गणराज्याचा अभ्यास ,शासकाची निवड ,प्रशासकीय रचना , ग्राम व्यवस्था या सर्वांचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

**3)** बुद्धकालीन गणराज्य व महाजनपद:-

बुद्धाकालामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे 16 महाजनपद10 गणराज्य अस्तित्वात होते.या सर्वव्यवस्थांचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे. पाली त्रिपिटकावरून संपूर्ण देश चार शक्ती शाली राज्यामध्ये व दहा लहान स्वशासित स्वतंत्र गणतंत्र आणि बुद्ध पूर्व काळापासून चालत आलेल्या 16 महाजन पदांमध्ये विभक्त होता या गणतंत्र आणि जनपदा पैकी कित्येक उपरोक्त राज्य राज्यांमध्ये अंतर्भूत झालेले होते. लहान लहान गणराज्य लोप होऊन जवळच्या एकसत्ताक राज्यामध्ये समाविष्ट झालेली होती. उत्तर पांचाल आणि कुरूंचा बराच भाग कोसल राज्यामध्ये गेलेला होता. याप्रकारे दक्षिण पांचाल आणि जनपदाचा काही भाग वत्स राज्यामध्ये समाविष्ट झालेला होता सुरसेन जनपद अवंतीच्या प्रभावाखाली होते आणि कपिल वस्तूचे शाक्य आणि केसपुत्तचे कालाम हे कोसल राजाच्या अधीन होते जनवसभ सुत्ताचे भौगोलिक महत्त्व या गोष्टीला कारण आहे की तेथे बुद्धकालीन भारताच्या दहा जन पदांचे दोन दोन च्या जोडीच्या रूपात वर्णन आहे जसे काशी आणि कोसल, वज्जी आणि मल्ल, चेदी आणि वत्स, कुरु आणि पांचाल, मत्स आणि सुरसेन या सूत्रामध्ये अंग आणि मगध यांचाही उल्लेख आहे डॉ. राजबली पांडे यांच्या मते बुद्धाच्या वेळेस देशाच्या राजकीय जीवनाचे केंद्र उत्तर पूर्व भारत होता. उत्तर भारताच्या राज्यामध्ये त्यावेळेस 14 राज्यांचा उल्लेख सापडतो त्यापैकी दहा गणराज्य अशी होती की जी पांचालच्या पूर्वेस आणि गंगा तथा हिमालयामध्ये होती चार प्रसिद्ध आणि शक्तिशाली राज्य होती ती म्हणजे मगध ,कोसल, वत्स आणि अवंती त्यावेळी सर्व राज्यांना आपल्या अधिन ठेवू शकेल असे कोणतेही सार्वभौम राज्य बनलेले दिसून येत नव्हते एकीकडे गणराज्य आणि राजतंत्र यामध्ये संघर्ष होता म्हणून राज्या राज्यामध्ये परस्पर युद्ध होत असे . दुसरीकडे मोठ मोठाले राजतंत्र आजूबाजूला लहान लहान राज्यांना हडप करीत होते .

4 ) बुद्धकालीन व आधुनिक भारतीय गणराज्याचा तुलनात्मक अभ्यास:

बुद्धकालीन गणराज्य आणि आधुनिक गणराज्य यांचा तुलनात्मक अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.गणराज्याचा प्रमुख हा लोंकानी निवडलेला असायचा ,त्याच बरोबर आधुनिक शासन प्रमुख लोकांनी निवडलेला असतो .बुद्ध कालीन संसद व आधुनिक या मध्ये फार फरक दिसत नाही .न्याय व्यवस्था सुद्धा प्राचीन गणराज्य आणि आजची सारखीच दिसते.प्रशासन याची रचना सुद्धा जवळपास सारखीच आहे .या सर्वांचा अभ्यास तुलनात्मक पद्धतीने करण्यात येणार आहे .

5) बुद्धांचे राजकीय विचार:-

बुद्धांनी समता तत्व मांडताना शाक्य गणराज्यातील शाक्य यांचा अहंपणा नाहीसा  करून सर्व समान आहेत यांचे सुंदर उदाहरण देतात ते असे भगवंत आम्ही शाक्य गर्विष्ठ आहोत आणि हा उपाली न्हावी बऱ्याच दिवसापासून आमची सेवा करीत आहे भगवंतांनी आमच्या अगोदर त्याला आपल्या संघामध्ये घ्यावे म्हणजे त्याला आम्ही तो आदर आणि मान देऊ. आणि आमच्यातील शक्यांचा गर्व नाहीसा होईल . शाक्याना आपण श्रेष्ठ आहोत याचा खोटा अभिमान होता. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याची सेवा करतो म्हणजे तो गुलाम आहे हा समाज चुकीचा आहे .म्हणून शाक्य तथागताकडे जाऊन याचना करतात  उपाली न्हाव्याला आमच्या अगोदर संघात घ्या म्हणजे आपल्या संघातील समतेच्या आचरणाने आम्हालाही उपाली न्ह्याव्यासोबत समतेने राहता येईल व आमच्यातील गर्व  नाहीसा होईल. जाती ,वंश, श्रेष्ठत्वाची  खुळचट समजही नाहीसी होईल उपाली बरोबरच सुमंगल , छन्न  ,धम्मीय ,कुप्पन कुट हे सर्व  हिन लेखलेल्या जातीतील होते त्यातही तथागत बुद्धाने आपल्या धम्मातील संघात  महारोगी सुप्रबुद्ध यालाही धम्मात प्रवेश दिला. स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे संघात प्रवेश दिला. स्त्री पुरुष समतेचे तत्व तथागत बुद्धांनी प्रसेनजित राजाला पटवून दिले

स्वातंत्र्यसंबंधी बुद्धाचे विचार

समतेबरोबरच बुद्धांनी स्वातंत्र्याचा विचार मांडला आहे त्यांनी  स्वातंत्र्य विषयक विचार मांडताना कुणाचेही स्वातंत्र्य हिरावून घेतलेले नसून प्रत्येक

व्यक्तीला स्वतंत्रपणे जगण्याचा स्वतंत्र विचार दिला आहे . तथागतांनी बंधुता संबंधी आपले विचार स्पष्ट केले आहेत शाक्य आणि कोलीय गणराज्यातील युद्ध टाळण्यासाठी सिद्धार्थाने आपली मावशी गौतमी जवळ आपल्या मनातील बंधुता विशद करताना म्हणतात मैत्री भावनेचा विचार करून निसर्गाला मान्य असणारा बंधुत्वाचा विचार तथागत बुद्धाने आपल्या विचारातून स्पष्ट केला आहे बंधुता समाज मनात खोलवर रुजविण्याचा प्रयत्न केला माणसा माणसात बंधुभाव असावा असा मानवी कल्याणाचा विचार मांडलेला आहे.

न्याय विषयक बुद्धांचे विचार:-

बुद्धांनी न्यायासंबंधी विचार मांडले आहेत राजा प्रसेनजीतला म्हटले आपल्या प्रजाजनांना एकुलत्या एक मुलाप्रमाणे प्रेमाने जपा त्यांच्यावर जुलूम करू नका, त्यांचा नाश करू नका आपल्या शरीराच्या प्रत्येक अवयव आपल्या ताब्यात ठेवा. कुमार्गाच्या विचाराचा त्याग करा .सन्मार्गाने जा , दुसऱ्यांना पायदळी तुडवून स्वतः उच्चपदी चढू नका, दुःखी ताला सुख द्या आणि त्याला आपला मित्र माना राजा प्रसेनजीतला धम्मदीक्षा दिल्यानंतर तथागताने न्यायाचा विचार आपल्या तत्त्वज्ञानातून स्पष्ट केला आहे

मनुष्याने बुद्धिमान झाले पाहिजे यामुळेच त्याला शहाणपणा येतो कारण प्रज्ञा या शब्दाचा अर्थ शहाणपणा होतो. शहाणपणा असलेला व्यक्ती न्यायी असतो. अन्यायी असू शकत नाही कारण त्याला एखादी गोष्ट करावयाची असल्यास तो ती आनंदाने व प्रामाणिकपणे करेल. उलट तो त्यातील सत्यता अधिक जाणून घेईल इतरांना सत्य समजावून सांगेल सत्य मार्गाने जाण्याची सुचविल. कोणाचीही हिंसा प्राणीमात्राची आणि शाब्दिक हिंसा होणार नाही याची काळजी घेईल तोच खरा धर्म रक्षक असतो. मार्गदर्शन करणारा असतो. अशा पुरुषाला न्यायी पुरुष म्हणावे न्यायी आणि सज्जन पुरुष कसा असावा याची माहिती दिली आहे. न्याय आणि सदाचरणाने वागणाऱ्या पुरुषाला श्रेष्ठ पुरुष म्हटले आहे. कसे वागायचे आणि कसे वागायचे नाही यासंबंधीचे नियम केवळ औपचारिक नव्हते त्यांना कायद्याचे स्वरूप असून त्यास आरोप ठेवणे ,न्याय परीक्षा आणि शिक्षा यांचा अंतर्भाव होईल. एखाद्या मनुष्याने अपराध

केला आणि त्याला त्या अपराधाबद्दल शिक्षा झाली तर ती त्याची कर्माचे फळ समजून त्याने मान्य केली पाहिजे योग्य रीतीने नियोजन केलेल्या न्याय मंडळाशिवाय भिक्षुला शिक्षा करता येत नसे. हे न्याय मंडळ ज्या ठिकाणी भिक्षूच्या हातून अपराध घडला त्या ठिकाणी राहणाऱ्या भिक्षुंचे बनवलेले असे. स्वतःच्या बचावासाठी पूर्ण संधी दिली नसल्यास कोणतीही न्याय परीक्षा कायदेशीर मानली जात नसे. अपराध घडला असूनही एखाद्या भिक्षूने तो कबूल केला नाही तर त्याला तो अपराध करताना ज्या भिक्षुने पहिले असेल त्या भिक्षूने  तो सभेत सांगायचा असे झाल्यावर मग अपराधी भिक्षू वर आरोप ठेवून त्या  न्याय परीक्षेला सुरुवात होईल

बुद्धाचे लोकशाही संबंधी विचार :-

लोकशाही म्हणजे जीवन जगण्याची पद्धत होय किंवा समता स्वातंत्र्य बंधुता न्याय या मूल्यांची अंमलबजावणी करणे म्हणजे लोकशाही होय. बुद्धाने वज्जीच्या प्रजातंत्राचे कौतुक केले वज्जी लोक लोकशाही पद्धतीने लोकांच्या सभा भरवतात, एकत्र येतात ,एकोप्याने उभे राहतात ,उद्दिष्ट ठरविल्यानंतर सर्व सामान्य पद्धतीने त्यावर एकत्रपणे काम करतात ,नियमांचे पालन करतात, वृद्धांना मान देतात, प्रजातंत्रावर विश्वास ठेवतात , प्रजातंत्र प्रमाणे आचरण ठेवतात तोपर्यंत त्यांचे कल्याण होणार बुद्धाने आपल्या धम्मामध्ये लोकशाही मूल्यांची स्वीकार केला होता बुद्धांनी गणराज्य लोकशाहीचे समर्थन केले आहे.

बुद्धाला या देशात माणूस स्वतंत्र हवा होता त्याला त्याच्या मनाप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य असा अधिकार हवा होता तो कोणाचा  गुलाम असता कामा नये म्हणून त्याने विषमतेवर आघात करून या देशात समतेचे तत्व रुजविले कायद्याचे राज्यही समतेच्या तत्त्वावरच आधारित असावे कोणाशीही वैर  न ठेवता बंधू भावानेच वागले पाहिजे. अपराधाची सजा ही  न्यायाच्या व सत्या च्या आधारावर असावी तथागताने जगाला समता, स्वातंत्र्य ,बंधुता, न्याय लोकशाही हा विचार दिला.

6) उपसंहार:-

या प्रकरणामध्ये संशोधानाचे निष्कर्ष मांडण्यात येतील .बुद्धपूर्व काळातील आणि बुद्ध काळातील असलेली शासन व्यवस्था कशी कार्यरत होती .ते कार्य कसे करीत होते याचे निष्कर्ष या प्रकरणामध्ये मांडले जातील. गणराज्ये आणि महाजपद यांच्या संबधीची  निष्कर्ष या प्रकरणामध्ये मांडण्यात येतील . बुद्धाचे लोकशाही संबंधी असलेले विचारा सबंधी निष्कर्ष यामध्ये मांडण्यात येतील.बुद्धकालीन आणि आधुनिक काळातील गणराज्य पद्धती संबंधीचा तुलनात्मक अभ्यासाचे निष्कर्ष या प्रकरणामध्ये स्पष्ट करण्यात येईल.

**संदर्भ**:-

1) प्रा. चौसाळकर अशोक, प्राचीन भारतीय राजकीय विचार ,प्रतिमा प्रकाशन पुणे,2011.

2) प्रा. गाडेकर किसन, बुद्ध ,कबीर ,फुले तत्त्वज्ञान व भारतीय समाज, बोधिपर्ण प्रकाशन, औरंगाबाद ,2019.

3) पाटील निरंजन, बुद्धकालीन व आधुनिक लोकशाही गणराज्ये, सम्यक व्हिजन, मुंबई, 2012.

4) डॉ. आंबेडकर भीमराव रामजी, (अनु. डॉ.  भदंत आनंद कौसल्यायान) बुद्ध उनका धर्म, बुद्धभूमी प्रकाशन नागपूर.

5) Altekar A. S., State and Government In Ancient India, Motilal Banarsidass Publication
Delhi,7th Reprint 2016.

6) Gokhale B.G., New Light On Early Buddhism, Popular publication, Mumbai.

7)  कोसंबी धर्मानंद, बुद्धलीला सार संग्रह, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ,मुंबई.

संशोधक
विनोद  वानखडे

संशोधक मार्गदर्शक
डॉ.मानवते यु.एच.
बी.पी.ई.कॉलेज हनेगाव